**महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग**

**जिल्हा परिषद, भंडारा आरोग्य विभागा अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात.**

**पदभरती सन २०२१ - जाहिरात क्रमांक ०१/२०२१**

महा.शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९९/आस्था८, दि.१४ जुन, २०२१ व ग्रामविकास विभागाचे समक्रमांकाचे शासन शुध्दीपत्रक दिनांक २० ऑगष्ट २०२१ अन्वये मेघाभरती २०१९ अंतर्गत माहे मार्च, २०१९ मध्ये जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेल्या गट-क मधिल १८ संवर्गापैकी आरोग्य विभागाशी संबंधित आरोग्य पर्यवेक्षक, औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आरोग्य सेवक (पुरुष) व आरोग्य सेविका या ५ संवर्गाकरीता जाहीरातीमध्ये नमुद करण्यात आलेल्या सर्व रिक्त पदांची भरती करण्यास शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली आहे. **सरळसेवा भरती २०१९ अन्वये प्रसिध्द जाहिरातीमध्ये सुधारीत ४ टक्के दिव्यांग आरक्षणानुसार तसेच ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय दि. २२ फेब्रुवारी २०२१ मध्ये नमुद तरतुदीनुसार दिव्यांगाचे पदांमध्ये बदल झालेले आहे. त्यामुळे सुधारीत जाहिरातीनुसार दिव्यांगाची जेवढी पदे वाढलेली आहेत फक्त त्याच पदाकरिता पात्र दिव्यांग उमदवारांनी विहीत मुदतीत अर्ज सादर करावेत. यापूर्वी जाहिरातीनुसार दिव्यांग उमेदवारांनी खुल्या अथवा इतर प्रवर्गातून अर्ज केला असल्यास अशा उमेदवारांनी नव्याने अर्ज न करता सुधारीत विकल्प द्यावा. तसेच एसईबीसी चे आरक्षण रद्द ठरविण्यात आल्यामुळे सदर उमेदवारांना ईडब्लूएस किंवा खुल्या प्रवार्गाचा विकल्प देणे आवश्यक आहे. www.maharddzp.com** या संकेतस्थळावर **उमेदवारांनी** आपले अर्ज व विकल्प सादर करावेत. माहे मार्च, २०१९ मध्ये जाहीरातीनुसार आरोग्य विभागाशी संबंधित पदाकरीता अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी **www.maharddzp.com** या संकेतस्थळावर जाऊन **Login ID व Password create** करणे आवश्यक आहे.

सविस्तर जाहीरात व जाहीर प्रकटन **www.maharddzp.com** व bhandarazp.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पदभरतीसाठी संवर्गनिहाय घोषित पदे

| अ.क्र. | संवर्ग | पंदाची संख्या |
|---|---|---|
| १ | औषध निर्माता | ३ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) | ७ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी मधुन | ३५ |
| ४ | आरोग्य सेविका (महिला) | ६५ |
| ५ | आरोग्य पर्यवेक्षक | १ |
| | **एकुण** | **१११** |

**अर्ज ऑनलाईन सादर करण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरुवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणेचा अंतीम दिनांक |
|---|---|---|
| १ | दिनांक ०१/०९/२०२१ पासुन | दिनांक २१/०९/२०२१ पर्यंत |

वरील पदांची समाजिक आणि समांतर आरक्षण निहाय पदांची माहिती, शैक्षणिक अर्हता व अनुभव, कमाल व किमान वयोमर्यादा, भरती प्रक्रिया शुल्क, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना, परिक्षेचे स्वरुप, निवड पध्दत, सर्वसाधारण अटि व शर्ती इत्यादीबाबत अधिक माहिती **www.maharddzp.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज करण्यासाठी **www.maharddzp.com** हे संकेतस्थळ दिनांक ०१/०९/२०२१ पासुन ते दिनांक २१/०९/२०२१ रोजी मध्यरात्री. ११.५९ P.M. वाजेपर्यंत कार्यरत राहील. अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवारांनी सविस्तर जाहिरातीत दिलेल्या सर्व सुचना काळजीपूर्वक वाचुन अर्ज सादर करावे.

भरतीप्रक्रिया/परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे पदांच्या एकुण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्यांचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण:- भंडारा

दिनांक -

| | | |
|---|---|---|
| **(डॉ.प्रशांत उईके)** | **(विनय एस.मुन)** | **(संदिप कदम)** |
| **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **जिल्हाधिकारी** |
| **जिल्हा परिषद,भंडारा.** | **जिल्हा परिषद, भंडारा.** | **भंडारा.** |